पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
मा.विधी समिती
कार्यपत्रिका क्रमांक १०
**<u>सभावृत्तांत</u>**

दिनांक - १८/१०/२०१३ वेळ – दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक १८/१०/२०१३ रोजी दुपारी १२.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. जवळकर वैशाली राहुल - सभापती
२) मा. मोटे किरण बाळासाहेब
३) मा. काळभोर वैशाली जालिंदर
४) मा. जाधव साधना रामदास
५) मा. प्रशांत शितोळे
६) मा. शितोळे शैलजा बाबुराव
७) मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव
८) मा. बारणे निलेश हिरामण

याशिवाय मा.टेकाळे, मा.खांडकेकर, मा.दुरगुडे – सहा आयुक्त, मा.गावडे – नगरसचिव, मा.जुंधारे – कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.१०) मा.महापालिका सभा माहे ऑक्टो.२०१३ सभेस अनुपस्थित राहणेस परवानगी मिळणेबाबत - मा.वैशाली काळभोर, मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.११) पुणे उरो व जिल्हा रुग्णालय औंध पुणे येथे रुग्णालय परिसरात पाण्याची उंच टाकी बांधणेबाबत.

विषय क्र.१२) दापोडी ते मिलेनियम चौक ते पीडब्लूडी कॉर्नर, रहाटणी फाटा ते रहाटणी गांव काळेवाडी मनपा शाळा पिंपरी गांव कृष्णाचौक ते साईचौक ते पाण्याची टाकी, एम.के.हॉटेल, दर्शन सोसायटी व इतर रस्ते वाहतूक सुधारणा करणे.

विषय क्र.१३) ड प्रभागात पिंपळे सौदागर परिसरातील रस्त्यांवर व चौकामध्ये वाहतूक सुधारणा विषयक कामे करणे.

विषय क्र.१४) क प्रभागात विविध ठिकाणी रस्त्यावर व चौकामध्ये वाहतूक सुधारणा व दिशादर्शक फलक (साईनेज बोर्ड) विषयक कामे करणे.

विषय क्र.१५) ब प्रभाग कार्यक्षेत्रातील मुख्य रस्त्यावरील हॉस्पिटल परिसरात विद्यार्थ्यांना, नागरिकांना सुरक्षित रस्ता ओलांडण्याच्या सुविधा तयार करणे.

विषय क्र.१६) विधी समिती सभा ठराव क्र.५८, दि.०६/०९/२०१३ मध्ये दुरुस्तीबाबत - मा.वैशाली काळभोर, मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१७) पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा ( सेवाभरती व सेवांचे वर्गीकरण ) नियम २०१३ बाबत.

विषय क्र.१८) पिंपरी चिंचवड महानगरपालिका विभागांतर्गत आस्थापनेवरील सर्व पदांचा आढावा घेऊन नवीन पदांच्या पद निर्मितीबाबत प्रस्ताव.

विषय क्र.१९) वॉर्ड क्र.४१ आकुर्डी खंडोबा माळ ते दळवीनगर **ROB** चे कडेने फुटपाथ करणे व रोड डिव्हाडर करणे या कामातून प्रभाग क्र.११ व प्रभाग क्र.१४ मध्ये केलेल्या कामास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत - मा. वैशाली काळभोर, मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक २०/०९/२०१३ व २७/०९/२०१३ रोजी झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्र.८ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक : १०६ विषय क्रमांक : १
दिनांक : १८/१०/२०१३ विभाग : क मुख्यालय
सुचक : मा.किरण मोटे अनुमोदक : मा. वैशाली काळभोर
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.स्था/ब.मु./९४/२०१३, दि.२१/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपा मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये स्थापत्य विषयक व सुधारणा कामे करणेकामी येणा-या र.रु.२२,५०,०००/- (अक्षरी र.रु.बावीस लाख पन्नास हजार फक्त ) चे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १०७ विषय क्रमांक : २
दिनांक : १८/१०/२०१३ विभाग : क्रीडा
सुचक : मा.साधना जाधव अनुमोदक : मा. प्रशांत शितोळे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.क्रीडा/१/कावि/१४४५/२०१३, दि.०३/१०/२०१३

विषय - मनपा क्रीडा धोरणास मान्यता देणेबाबत.

**विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.**

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १०८ विषय क्रमांक : ३
दिनांक : १८/१०/२०१३ विभाग : स्थापत्य बीआरटीएस
सुचक : मा.शैलजा शितोळे अनुमोदक : मा. भाऊसाहेब भोईर
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.स्था/बीआरटीएस/६६३/२०१३, दि.२६/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सांगवी ते किवळे बीआरटीएस रस्त्यावरील काळेवाडी फाटा ते डांगे चौक दरम्यान लक्ष्मणनगर येथे सबवे बांधणेचे कामास व याकामी येणा-या र.रु.३,८८,५५,५८६/- ( अक्षरी र.रु.तीन कोटी अठ्ठयाऐंशी लाख पंचावन्न हजार पाचशे शहाऐंशी फक्त ) चे खर्चास मा.महापालिका सभेची मान्यता

घेणेकामी शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १०९ विषय क्रमांक : ४
दिनांक : १८/१०/२०१३ विभाग : सार्वजनिक वाचनालय
सुचक : मा.निलेश बारणे अनुमोदक : मा. किरण मोटे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.सावा/४/कावि/४७/२०१३, दि.०३/१०/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला १६ सार्वजनिक वाचनालय चालविणेसाठी सध्या होणारा एकूण खर्च र.रु.१,३१,२१,७२२/- येत असून १६ सार्वजनिक वाचनालयाचे वार्षिक उत्पन्न मार्च २०१४ अखेर अंदाजे र.रु.३,२६,१२२/- तसेच KRA मध्ये सुचविलेप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये नविन गावे समाविष्ट झाल्याने नव्याने सार्वजनिक वाचनालय सुरु करण्यात येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला १६ सार्वजनिक वाचनालयाच्या वार्षिक खर्चामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. तसेच पुस्तकाच्या किंमतीमध्येही वाढ होत आहे. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग परिपत्रक जी.ई.एन.१०९८/२५८/प्र.क्र.७०/९८ नवि-२४ दिनांक २/७/१९९८ अन्वये महानगरपालिकेच्या महसुली उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याबाबत कळविले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २९ मधील ४५८ (४२) या तरतूदीस अधिन राहून व राष्ट्रीय मुल्यवृध्दीच्या अल्प बचत योजनांनुसार विचार करता सार्वजनिक वाचनालयांचे शुल्क त्या प्रमाणात खालील प्रमाणे वाढविणे आवश्यक आहे. अशा प्रकारच्या शुल्क वाढीमुळे साधारणत: (एका वाचनालय) महसूल र.रु.७६,५००/- अपेक्षित असून १६ वाचनालयांचे सभासदांपासून महापालिकेस अंदाजे र.रु.१२,२४,०००/- इतका महसूल मिळेल. सबब सार्वजनिक वाचनालय शुल्कात माहे १ एप्रिल २०१४ पासून पुढील प्रमाणे दरवाढ सुचविणेत येत आहे.

१) वाचनालय अनामत र.रु.५०/- ऐवजी र.रु.२००/-
२) वाचनालय मासिक वर्गणी र.रु.१५/- ऐवजी र.रु.३०/-
३) वार्षिक वर्गणी अगाऊ र.रु.१२५/- ऐवजी र.रु.३००/-
(वर्गणी अगाऊ न भरल्यास र.रु.३६०/-)
४) वाचनालय प्रवेश शुल्क र.रु.१०/- ऐवजी र.रु.१०/-

उपरोक्त प्रमाणे शुल्कात वाढ करणेकामी मा.स्थायी समिती मार्फत मा.महापालिका सभेची मान्यता घेणेकामी शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ११० विषय क्रमांक : ५
दिनांक : १८/१०/२०१३ विभाग : पाणीपुरवठा
सुचक : मा.वैशाली काळभोर अनुमोदक : मा. साधना जाधव
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.पापु/१५/कावि/४२६/२०१३, दि.०७/१०/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

जलक्षेत्र क्र.ड/१२ पिंपळे गुरव परिसरातील गुरुत्व वाहिनीवरील थेट पाणी पुरवठा बंद करणे कामी स.नं.७२ येथे २० द.ल.लि.क्षमतेची टाकी बांधणे या कामास सन २०१२-१३ च्या अंदाजपत्रकात

र.रु.१,३०,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळालेली असल्याने सन २०१३-१४ च्या आर्थिक वर्षासाठी या कामास र.रु.१,३०,००,०००/- चे रकमेस मान्यता मिळणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १११ विषय क्रमांक : ६

दिनांक : १८/१०/२०१३ विभाग : पाणी पुरवठा

सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा. शैलजा शितोळे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.पापु/१५/कावि/४२७/२०१३, दि.०७/१०/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

जुनी सांगवी येथे ६ लक्ष लिटर क्षमतेची टाकी पंप हाऊस व संप पाडून १५ लक्ष लिटर क्षमतेची नवीन टाकी बांधणे या कामास सन २०१२-१३ च्या अंदाजपत्रकात र.रु.१,१५,९५,६३३/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळालेली असल्याने सन २०१३-१४ च्या आर्थिक वर्षासाठी या कामास र.रु.१,१५,९५,६३३/- चे रकमेस मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ११२ विषय क्रमांक : ७

दिनांक : १८/१०/२०१३ विभाग : नगररचना

सुचक : मा.भाऊसाहेब भोईर अनुमोदक : मा. निलेश बारणे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.नगररचना/१७/२७९/२०१३, दि.०८/१०/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील आरक्षणे तसेच निळी, लाल पुररेषा व नदीचे सर्वेक्षण करणे कामास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

**विषय क्रमांक ७ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.**

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ११३ विषय क्रमांक : ८

दिनांक : १८/१०/२०१३ विभाग : प्रशासन

सुचक : मा.निलेश बारणे अनुमोदक : मा. भाऊसाहेब भोईर

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.प्रशा/२/कावि/२२/२०१३, दि.१४/१०/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर नगरसचिव अभिनामाचे एक पद पे बॅन्ड र.रु. १५६०० – ३९१०० ग्रेड वेतन र.रु. ६६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहे. सदरचे पद सरळसेवा प्रवेशाने भरणेकरीता दिनांक ३०/०७/२०१३ रोजी वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात येऊन अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुसार प्राप्त झालेल्या अर्जामधून पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेण्याकरीता दिनांक २६/०९/२०१३ रोजी कर्मचारी निवड समिती सभा आयोजित करण्यात आली होती. प्रस्तुतच्या निवड समितीने पात्र उमेदवारांच्या मौखिक मुलाखती घेऊन उमेदवाराची शैक्षणिक अर्हता, कामाचा अनुभव व मुलाखतीमध्ये दाखविलेल्या प्राविण्या नुसार श्री. उल्हास बबनराव जगताप यांना

सरळसेवा प्रवेशाने नगरसचिव पदावर र.रु.१५६०० – ३९१०० ग्रेड वेतन र.रु. ६६०० या वेतनश्रेणीमध्ये प्रथमत: १ वर्ष परिविक्षाधिन कालावधीकरीता मा.विधी / मा.महापालिका सभेच्या मान्यतेने नेमणूक देणेकामी शिफारस केली आहे. श्री.उल्हास बबनराव जगताप यांना नगरसचिव पदावर सरळसेवा प्रवेशाने र.रु.१५६०० – ३९१०० ग्रेड वेतन र.रु. ६६०० या वेतनश्रेणी मध्ये प्रथमत: १ वर्ष परिविक्षाधीन कालावधीकरीता नेमणूक देण्यास मान्यता मिळणेबाबत तसेच प्रस्तावात नमुद प्रपत्र अ प्रमाणे नगरसचिव पदाच्या कर्तव्ये व जबाबदा-या निश्चित करणेबाबत मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ११४ — विषय क्रमांक : ९

दिनांक : १८/१०/२०१३ — विभाग : प्रशासन

सुचक : मा.शैलजा शितोळे — अनुमोदक : मा. प्रशांत शितोळे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.प्रशा/२/कावि/२१/२०१३, दि.१०/१०/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

डॉ.यशवंतराव माने, उपजिल्हाधिकारी यांचे सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावर प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार १ वर्ष कालावधीकरीता नियुक्ती करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक : ११५ — विषय क्रमांक : १०

दिनांक : १८/१०/२०१३

सुचक : मा.वैशाली काळभोर — अनुमोदक : मा. शैलजा शितोळे

संदर्भ : मा.वैशाली काळभोर, मा. शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव -

सौ.सविता सुरेश साळुंके - नगरसदस्या यांना त्यांच्या कौटुंबिक कारणास्तव ८ ऑक्टोबर ते ९ नोव्हेंबर २०१३ अखेर परदेशी जाणेचे असल्याने माहे ऑक्टोंबर २०१३ चे मा.महापालिका सभेस अनुपस्थित राहणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ११६ — विषय क्रमांक : ११

दिनांक : १८/१०/२०१३ — विभाग : पाणीपुरवठा

सुचक : मा.किरण मोटे — अनुमोदक : मा. निलेश बारणे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.पापु/१५/कावि/४३३/२०१३, दि.१४/१०/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.आमदार श्री.लक्ष्मण जगताप, चिंचवड विधानसभा मतदार संघ यांनी त्यांच्याकडील दि.०८/०५/२०१३ रोजीच्या पत्रान्वये मा.उपसंचालक, आरोग्य परिमंडल, पुणे यांना उरो रुग्णालय, औंध त्यांच्या जागेमध्ये असलेली सध्याची पाण्याची टाकी व संप कमी क्षमतेची व अत्यंत जुनी झाली असलेने त्याच परिसरात पाण्याची नवीन उंच टाकी व जमिनीखालील टाकी बांधणे या प्रयोजनाकरिता

आरोग्य परिमंडल, पुणे या स्तरावर मान्यता मिळणेबाबत मागणी केली होती व सदर पाण्याच्या उंच टाकीची क्षमता वाढवून रुग्णालय परिसर व रुग्णालयाजवळील म.न.पा.च्या नवी सांगवी वॉर्ड क्र.५८ या परिसरातील देखील पाण्याची कमतरता भरुन निघेल या उद्देशाने मागणी केली होती. त्या अनुषंगाने जिल्हा शल्याचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, पुणे - २७ यांनी मा.उपसंचालक, आरोग्यसेवा, पुणे परिमंडल यांना उद्देशून " रुग्णालयाच्या सध्या असलेल्या टाकी शेजारील (पश्चिम बाजूस) जागेत नवीन टाकी दोन्ही रुग्णालयांसाठी बांधणेस काही हरकत नाही. त्याबाबत संबंधितांचा अहवाल घेऊन पाण्याची नवीन टाकी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे बांधकाम करण्यास या कार्यालयाची हरकत नाही या आशयाचे पत्र दि.१०/०६/२०१३ रोजी दिले आहे. " सदर उरो रुग्णालय परिसरातील सदनिका या ठिकाणचा पाणीपुरवठा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत करण्यात येत असून त्यांचेमार्फत रितसर पाणीपट्टी वसुल करण्यात येत आहे. याशिवाय त्या परिसरातील मिळकतींचा मिळकतकर देखील म.न.पा.मार्फत वसुल करण्यात येत आहे. याशिवाय या रुग्णालयाच्या जवळच्या परिसरात म.न.पा.च्या प्रभाग क्र.५८ मधील (CME कॉलनी, गणेशनगर, समतानगर, स्वामी विवेकानंदनगर) अंदाजे ५०,००० लोकसंख्या असलेल्या भागाला पाणीपुरवठा करता येणे शक्य आहे. सद्यस्थितीत हा भाग सध्याचे पी.डब्लू.डी. जुनी टाकीच्या दृष्टीने उंचावर असल्याने पाण्याच्या तक्रारींना सामोरे जावे लागत आहे. मा.आमदार यांनी मागणी केलेप्रमाणे उरो रुग्णालयाच्या परिसरामध्ये टाकी बांधणे हे मनपाच्या सुध्दा हिताचे आहे. परंतु सदरचे बांधकाम हे त्यांच्या हद्दीत करावयाचे असलेने त्यास मा.महानगरपालिकेची मान्यता घेणेकामी शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सवानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ११७ — विषय क्रमांक : १२

दिनांक : १८/१०/२०१३ — विभाग : वाहतूक नियोजन कक्ष

सुचक : मा.वैशाली काळभोर — अनुमोदक : मा. भाऊसाहेब भोईर

संदर्भ : मा.सह शहर अभियंता यांचेकडील क्र.वाहतूक/स्था/१/कावि/७३/२०१३, दि.१७/१०/२०१३

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

दापोडी ते मिलेनियम चौक ते पीडब्लूडी कॉर्नर, रहाटणी फाटा ते रहाटणी गाव, काळेवाडी मनपाशाळा, पिंपरीगांव कृष्णा चौक ते साईचौक ते पाण्याची टाकी, एम.के.हॉटेल, दर्शन सोसायटी व इतर रस्ते वाहतूक सुधारणा करणेकामी येणा-या र.रु.२२,५०,०००/- ( अक्षरी र.रु.बावीस लाख पन्नास हजार फक्त ) चे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सवानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ११८ — विषय क्रमांक : १३

दिनांक : १८/१०/२०१३ — विभाग : वाहतूक नियोजन कक्ष

सुचक : मा.साधना जाधव — अनुमोदक : मा. शैलजा शितोळे

संदर्भ : मा.सह शहर अभियंता यांचेकडील क्र.वाहतूक/स्था/१/कावि/७४/२०१३, दि.१७/१०/२०१३

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

ड प्रभागात पिंपळे सौदागर परिसरातील रस्त्यावर व चौकामध्ये वाहतूक सुधारणा विषयक कामे करणेकामी येणा-या र.रु.९,००,०००/- ( अक्षरी र.रु.नऊ लाख फक्त ) चे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ११९ विषय क्रमांक : १४

दिनांक : १८/१०/२०१३ विभाग : वाहतूक नियोजन कक्ष

सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा. किरण मोटे

संदर्भ : मा.सह शहर अभियंता यांचेकडील क्र.वाहतूक/स्था/१/कावि/७५/२०१३, दि.१७/१०/२०१३

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

क प्रभागात विविध ठिकाणी रस्त्यावर व चौकामध्ये वाहतूक सुधारणा व दिशादर्शक फलक (साईनेज बोर्ड) विषयक कामे करणेकामी येणा-या र.रु.९,००,०००/- ( अक्षरी र.रु.नऊ लाख फक्त ) चे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १२० विषय क्रमांक : १५

दिनांक : १८/१०/२०१३ विभाग : वाहतूक नियोजन कक्ष

सुचक : मा.निलेश बारणे अनुमोदक : मा. वैशाली काळभोर

संदर्भ : मा.सह शहर अभियंता यांचेकडील क्र.वाहतूक/स्था/१/कावि/७६/२०१३, दि.१७/१०/२०१३

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

ब प्रभाग कार्यक्षेत्रातील मुख्य रस्त्यावरील हॉस्पिटल परिसरात विद्यार्थ्यांना, नागरिकांना सुरक्षित रस्ता ओलांडणेच्या सुविधा तयार करणेकामी येणा-या र.रु.९,००,०००/- ( अक्ष र.रु.नऊ लाख फक्त ) चे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १२१ विषय क्रमांक : १६

दिनांक : १८/१०/२०१३

सुचक : मा.वैशाली काळभोर अनुमोदक : मा.शैलजा शितोळे

संदर्भ : मा.वैशाली काळभोर, मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव -

मा.विधी समिती ठराव क्रमांक ५८ दिनांक ०६/०९/२०१३ नुसार मनपाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये नुतनीकरण करणेच्या कामाचे सुधारित वाढीव अं. र.रु.२१,९९,२०६/- फक्तला मान्यता देणेत आलेली आहे. उपरोक्त मंजूर ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करणेत यावी. सदर कामाची मुळ प्रशासकीय मान्यता २८,००,५४१/- फक्त आहे व सुधारित वाढीव र.रु.२१,९९,२०६/- फक्त मिळून एकूण अंदाजे अपेक्षित खर्च र.रु.४९,९९,७४७/- होणार असल्याने एकूण सुधारित प्रशासकीय मान्यता र.रु. ४९,९९,७४७/- (अक्षरी र.रु.एकोणपन्नास लाख नव्याण्णव हजार सातशे सत्तेचाळीस फक्त) असे वाचण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १२२ विषय क्रमांक : १७

दिनांक : १८/१०/२०१३ विभाग : प्रशासन

सुचक : मा.शैलजा शितोळे अनुमोदक : मा. प्रशांत शितोळे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.प्रशा/०७/कावि/१०२८/२०१३, दि.१७/१०/२०१३

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवाभरती व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१३ बाबत.

**विषय क्रमांक १७ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.**

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १२३ विषय क्रमांक : १८

दिनांक : १८/१०/२०१३ विभाग : प्रशासन

सुचक : मा.किरण मोटे अनुमोदक : मा. निलेश बारणे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.प्रशा/०७/कावि/१०२९/२०१३, दि.१७/१०/२०१३

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिका विभागांतर्गत आस्थापनेवरील सर्व पदांचा आढावा घेऊन नवीन पदांच्या पद निर्मितीबाबत प्रस्ताव -

**विषय क्रमांक १८ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.**

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १२४ विषय क्रमांक : १९

दिनांक : १८/१०/२०१३

सुचक : मा.वैशाली काळभोर अनुमोदक : मा. शैलजा शितोळे

संदर्भ : मा.वैशाली काळभोर, मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव -

वॉर्ड क्र.४१ (जुना) आकुर्डी गावठाण परिसरात ठिकठिकाणी फुटपाथ, पेव्हिंग ब्लॉक, रोड डिव्हायडर इ. विकास कामे करणेत आली. तथापि वॉर्ड क्र.११ यमुनानगर मध्ये स्टॉर्म वॉटर लाईन टाकणे व तेथील मुख्य रस्ता पुन्हा पुर्ववत समपातळीत करणे हे काम वाहतुकीस अडथळा अथवा अपघात होऊ नये यासाठी डांबरीकरण करणे आवश्यक होते. तसेच प्रभाग क्र.१४ मधील वाहतुकनगरी मध्ये रस्त्यावर अवजड वाहनांची सतत वाहतूक असलेने तेथेही साईडपट्टी ***WBM*** करुन रस्ता समपातळीत करणे आवश्यक या काळात पावसाळयामुळे रस्त्यावर चिखल होऊनही अपघात होण्याची शक्यता होती. सदर सदर उपरोक्त दोन्ही कामास या काळात काम करणेस ठेकेदार उपलब्ध नसल्यामुळे सदरचे काम हे उपरोक्त कामातून तातडीने करणे गरजेचे होते. तरी सदर कामामधून दोन्ही कामे करण्यास व ठेकेदारास बील अदा करणेचे कामास कार्योत्तर मान्यता देणेत येत.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(जवळकर वैशाली राहुल)
**सभापती**
मा. विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ ९७४ /२०१३
दिनांक - २३/१०/२०१३

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.